**नि. फौ. ख. क.१२६/२००८**
सरकार **विरूध्द** सुरेश बिरामणे वगैरे

**आदेश निशाणी कमांक ३६३ वरील**

आरोपी क्र. ७ श्री.धर्मराव बाबा भगवतराव आत्राम याने प्रस्तुतचा अर्ज त्याला पासपोर्ट (पारपत्र) नुतनीकरण करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार आरोपीच्या म्हणण्यानुसार आरोपी हे सामाजिक जीवनाशी निगडीत असल्याने त्यांच्या गडचिरोली जिल्हयामध्ये विविध प्रकारच्या शैक्षणिक व सामाजिक संस्था आहेत. सदर संस्थांच्या कारभारासाठी नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी प्रस्तुत आरोपी यांना देशांतर्गत व देशाबाहेर जावे लागते. त्यामुळे त्यांचा पासपोर्ट (पारपत्र) क्र. आर ९७७७८३८ याचे नुतनीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सदर पासपोर्टचे नुतनीकरण केल्यानंतर आरोपी क्र. ७ यांना त्यांचे संस्थांच्या कारभारासाठी नवीन तंत्रज्ञान शिकणेकामी देशांतर्गत व देशाबाहेर जाणे सोईस्कर होईल. प्रस्तुत आरोपी हे त्यांना मिळालेल्या पासपोर्ट (पारपत्राचा) कोणत्याही प्रकार गैरवापर करणार नाही, म्हणून प्रस्तुत आरोपी यांनी पासपोर्ट (पारपत्र) नुतनीकरण करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जास सरकारी वकीलांनी म्हणणे दिलेले असून त्यांनी असे नमूद केलेले आहे की, कोरोना प्रादुर्भावामुळे देशाबाहेर जाण्याची परवानगी देणे आवश्यक नाही. अर्जात नमूद केल्याप्रमाणे ज्या देशात आरोपी क्र. ७ जाउ इच्छित आहे त्या देशात भारतातून येणा—या नागरिकांना कोरोना विषाणूमुळे बंदी केलेली आहे. आरोपी अर्जात चूकीची कारणे नमूद करून न्यायालयाची दिशाभूल करीत आहे. तसेच आरोपीचा हेतू देशाबाहेर पळून जाण्याचा दिसून येत आहे. त्यामुळे आरोपीचा अर्ज फेटाळण्यात यावा. प्रस्तुत अर्जावर चौकशी अधिकारी यांनी कोणतेही म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येतो.

३. प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द वन्यजीव संरक्षण अधिनियम

१९७२ चे कलम ९, ३९, ४०, ५०, ५१, ५२ भारतीय वन अधिनियम १९२७ कलम २६ (आय) अन्वये सध्या प्रलंबित आहे. आरोपीच्या म्हणणेनुसार आरोपी हे सामाजिक जीवनाशी निगडीत असल्याने त्यांच्या गडचिरोली जिल्हयामध्ये विविध प्रकारच्या शैक्षणिक व सामाजिक संस्था आहेत. सदर संस्थांच्या कारभारासाठी नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी प्रस्तुत आरोपी यांना देशांतर्गत व देशाबाहेर जाणेकामी पासपोर्ट (पारपत्र) नुतनीकरण करण्याची आवश्यकता आहे. आरोपीने सदरचा अर्ज प्रतिज्ञापत्रासोबत दाखल केला आहे. तसेच आरोपीने प्रतिज्ञापत्रात असे नमूद केले आहे की, ते जामिनाच्या अटी व शर्तीचे पालन करतील व कायद्याचे उल्लंघन करणार नाही. तसेच मिळालेल्या पारपत्राचा कोणत्याहीप्रकारे गैरवापर करणार नाही. अभिलेखाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, यापूर्वीदेखील आरोपीने पारपत्र नूतनीकरणसाठी परवानगी न्यायालयाकडून मिळवलेली आहे. त्यामुळे आरोपीस पासपोर्ट (पारपत्र) नुतनीकरण करण्याची परवानगी दिल्यास सरकार पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे आरोपीस पासपोर्ट (पारपत्र) क्र. आर ९७७७८३८ नुतनीकरण करणेची अटींवर परवानगी देणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी श्री. धर्मराव बाबा भगवंतराव आत्राम याला पासपोर्ट (पारपत्र) क्र. आर ९७७७८३८ नुतनीकरण करणेस परवानगी देण्यात येत आहे.

२. पासपोर्ट (पारपत्र) नुतनीकरण करण्याची परवानगी मिळाल्यानंतर आरोपीने त्याचा कोणत्याही प्रकारे दुरूपयोग करण्याचा नाही.

**सही/—**

दिनांक २९/१०/२०२१
ठिकाण:—सासवड.

**(श्रीमती डी. एम. पाटील)**
२रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सासवड.

**-: C E R T I F I C A T E :-**

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade 3) | : | Mrs. S. R.Kamble |
| Name of the P. O. | : | Smt. D. M. Patil, 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C., Saswad. |
| Date of Order | : | 29/10/2021 |
| Order signed by presiding officer on | : | 29/10/2021 |
| Order uploaded on | : | 30/10/2021 |